MHNS280016732025

<u>विशेष दिवाणी दावा क्र.११९/२०२५ मधील निशाणी क्र.३४ वरील आदेश</u>.

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ८ व १० ते १४ तर्फे कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन त्यांच्या विरूध्दचा विना कैफियतचा आदेश रद्द होवुन कैफियत रेकॉर्डवर घेण्यासाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रतिवादीविरूध्द वाटपासाठी, कोर्ट अधिकारासाठी रूपयांसाठीचा व मनाई हुकुमासाठीचा दावा दाखल केलेला आहे. परंतु प्रतिवादींना काही महत्वाचे कागदपत्र रेकॉर्डमधुन मिळु शकले नाही. तसेच वादी व प्रतिवादींच्या दरम्यान पुर्वी रे.मु.नं.१७१/२०१५ चा दावा याच मिळक्तीबाबत केलेला होता व त्यासंबंधीची कागदपत्रे गोळा करणेकामी प्रतिवादी यांना बराच कालावधी गेल्यामुळे व ते वेळेत न मिळाल्यामुळे मुदतीत कैफियत जबाब दाखल करता आला नाही. त्यामुळे प्रतिवादींना कैफियत जबाब दाखल करण्यास विलंब झालेला आहे. प्रतिवादींनी जाणुनबुजुन विलंब केलेला नाही. प्रतिवादी यांनी सदर मिळकत खरेदीसाठी बरीच मोठी रक्कम खर्च केलेली आहे व त्यामुळे सदर दाव्यात न्यायाच्या दृष्टीने कैफियत जबाब दाखल करणे आवश्यक आहे. सदरचा जबाब कैफियत दाखल करून न घेतल्यास प्रतिवादींचे कधीही भरून न येणारे नुकसान होईल. प्रतिवादींनी सदर अर्जासोबत त्यांची कैफियत जबाब दाखल केलेला आहे. सबब, जबाब कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन प्रतिवादी विरूध्द झालेला विना कैफियतचा आदेश रद्द होवुन प्रतिवादीची कैफियत रेकॉर्डवर घेणेबाबत योग्य तो हुकूम व्हावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

**२.** याउलट वादीतर्फे विद्वान वकीलांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे सादर करून अर्जास औपचारीक आक्षेप नोंदविला व सदरच्या आक्षेपाप्रमाणे त्यांचे म्हणणे असल्याचे नमूद केले.

**३.** मी दोन्ही पक्षांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता सदर दाव्यास प्रतिवादीने कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायोचित ठरेल. प्रतिवादीला कैफियत दाखल करण्यास जाणुनबुजून उशिर केलेला नाही असे कथन केले आहे. सदर कथन व वादीचा आक्षेप विचारात घेता माझ्या मते प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज मान्य केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास भविष्यामध्ये दाव्यात गुंतागुंत वाढण्याची शक्यता जास्त आहे. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

**१.** प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्रमांक ३४ मंजुर करण्यात येत आहे.

**२.** प्रतिवादी क्र.१ ते ८,१० ते १४ विरूध्द झालेला विना कैफियतचा आदेश रद्द होवुन वादीच्या दाव्यास कैफियत जबाब दाखल करणेकामी झालेला विलंब माफ करण्यात येतो. प्रतिवादींनी वादीला खर्च रक्कम रु. २००/— (दोनशे रूपये मात्र) द्यावेत.

(प्रस्तुतचा आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

SACHIN HINDURAO KHADE
Digitally signed by SACHIN HINDURAO KHADE
Date: 2026.04.17 15:39:49 +0530

(सचिन एच. खाडे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
सिन्नर

दिनांक :— १७/०४/२०२६.

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file are same, word to word as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Smt. Bharati D. Uphade, Stenographer (Grade-II) |
| Name of the Court | : | Civil Judge Senior Division, Sinnar. |
| Dictated on | : | 17/04/2026 |
| Transcribed on | : | -- |
| Checked on | : | 17/04/2026 |
| Signed on | : | 17/04/2026 |
| PDF uploaded on | : | 17/04/2026 |